# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

## जाहिरात

क्र. बीएमसी/जाहिरात/०१/२०१६ दिनांक : २९ डिसेंबर, २०१६

डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला अंतर्गत येणा-या साकोली (भंडारा), सिंदेवाही (चंद्रपूर), सोनापूर (गडचिरोली), हिवरा (गोंदीया), सेलसुरा (वर्धा), बुलडाणा व यवतमाळ या कृषि विज्ञान केंद्राकरीता **(Plan Project)** खालील तक्त्यात नमूद केलेली रिक्त पदे सरळ सेवेने नियुक्तीव्दारे भरण्याकरीता पात्र उमेदवारांकडून विद्यापीठ संकेतस्थळ www.pdkv.ac.in वर ऑनलाईन (Online) पध्दतीने अर्ज मागविण्यांत येत असुन ऑनलाईन पध्दतीने अर्ज करण्याची शेवटची **दिनांक ३१/०१/२०१७ पर्यंत राहिल.**

### तक्ता

| अ.क्र. | पदाचे नांव व वेतनश्रेणी | भरावयाची पदे | समांतर आरक्षण | सामाजिक आरक्षण → | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | कुशल मदतनिस रू.५२००-२०२००/- ग्रेड वेतन १८००/- | | ↓ | अ.जा. | अ.ज. | वि.जा.-अ | इ.मा.व. | खुला | एकुण |
| | | | महिला | ०१ | ०० | ०० | ०१ | ०२ | ०४ |
| | | | माजी सैनिक | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०१ |
| | | | इतर | ०१ | ०१ | ०१ | ०२ | ०४ | ०९ |
| | **एकुण पदे** | **१४** | | **०२** | **०१** | **०१** | **०३** | **०७** | **१४** |

**संज्ञांचे अर्थ** -अजा- अनुसुचित जाती, अज- अनुसुचित जमाती, विजा- विमुक्त जाती, इमाव- इतर मागास वर्ग.

| **अ.क्र.** | **पदाचे नांव** | **शैक्षणिक अर्हता** |
|---|---|---|
| **१** | **कुशल मदतनिस** | **१. एस.एस.सी. उत्तीर्ण किंवा समकक्ष परिक्षा उत्तीर्ण किंवा औद्योगीक प्रशिक्षण संस्थेचा अभ्यासक्रम उत्तीर्ण (आय.टी.आय.)** |

**परिक्षेचे स्वरूप**

| **अ.क्र.** | **पद** | **लेखी परिक्षा** |
|---|---|---|
| **१** | **कुशल मदतनिस** | **१०० गुण (परिक्षेचा अभ्यासक्रम विद्यापीठ संकेतस्थळवार उपलब्ध करून देण्यात येईल.)** |

शासन निर्णय क्र. प्रानिमं-२००७/प्र.क्र.४६/०७/१३-अ, दिनांक २७ जुन, २००८ अन्वये गुणवत्ता यादीत अंतर्भाव होण्यासाठी लेखी परिक्षेत किमान ४५ टक्के गुण मिळविणे आवश्यक राहील.

**वयोमर्यादा :**

अ. **दिनांक ३१/०१/२०१७** रोजी सर्वसाधारणतः उमेदवाराचे वय वर्षे १८ पेक्षा कमी व ३८ पेक्षा जास्त नसावे व मागासवर्गीय उमेदवारांकरिता सर्वसाधारण कमाल वयोमर्यादा ५ वर्षांनी शिथीलक्षम राहील.

**महत्वाच्या सुचना :**

| अ.क्र. | वर्गवारी | कमाल वयोमर्यादा | शेरा |
|---|---|---|---|
| १. | अपंग उमेदवार / प्रकल्पग्रस्त / भुकंपग्रस्त | ४५ वर्षे | शासन निर्णयानुसार |
| २. | माजी सैनिकांना विहीत वयोमर्यादेतील सुट ही सदर उमेदवाराच्या सशस्त्र दलात झालेल्या सेवेइतका कालावधी अधिक ३ वर्षे इतकी राहील. तसेच, अपंग माजी सैनिकांसाठी शासन सेवेतील कमाल वयोमर्यादा ४५ वर्षेपर्यंत राहील. | | |
| ३. | या विद्यापीठात तसेच महाराष्ट्रातील इतर कृषि विद्यापीठमध्ये तसेच राज्य शासन / केंद्र शासन/ निमशासकीय संस्था / शासन अनुदानित शैक्षणिक संस्थांमध्ये नियमीत आस्थापनेवर वेतनश्रेणीत कार्यरत असलेल्या कर्मचा-यांकरिता उच्चत्तम वयोमर्यादा लागु राहणार नाही. | | |

१) उमेदवारांनी विद्यापीठाचे www.pdkv.ac.in या संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करावयाचे असून, अर्ज करण्यासाठी लिंक दि. ०२/०१/२०१७ पासून उपलब्ध करून देण्यात येत आहे. ऑनलाईन पध्दतीने अर्ज स्वीकारण्याची अंतिम तारीख ३१/०१/२०१७ पर्यंत राहील तदनंतर अर्ज स्वीकारले जाणार नाही. अन्य कोणत्याही प्रकारे केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत याची विशेष नोंद घ्यावी.

२) ऑनलाईन पध्दतीने अर्ज करावयाचा असल्याने विद्यापीठाचे संकेतस्थळावर दिलेल्या सुचनांनुसार अचुक माहितीसह ऑनलाईन अर्ज सादर करावा तसेच अर्जासह कुठलीच कागदपत्रे/पोस्टाव्दारे सादर करण्याची आवश्यकता असणार नाही तसेच ऑनलाईन अर्ज सादर करतांना उमेदवाराने उचीत शुल्काचा भरणा संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने करावा.

३) वरिल प्रमाणे ऑनलाईन पध्दतीने प्राप्त माहितीच्या आधारे प्रार्थमीकदृष्टया पात्र असलेल्या उमेदवारांची लेखी परिक्षा घेण्यात येईल आणि लेखी परिक्षेत प्राप्त गुणांचे आधारे गुणवत्तेनुसार उमेदवारांना पर्याप्त संख्येत कागदपत्राची पडताळणी करण्यासाठी बोलाविण्यात येईल. पडताळणी दरम्यान कुठलेही आवश्यक दस्तावेज पुरविण्यास उमेदवार असमर्थ असल्यास असा उमेदवार गुणवत्ता यादीमध्ये अग्रक्रमावर असला तरी त्यास अपात्र ठरविण्यात येईल.

४) अर्जदाराने ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरतांना त्यामधील सर्व माहिती व सर्व बाबी काळजीपुर्वक पुर्ण व अचुक भरणे आवश्यक राहील. अर्ज सादर करण्याचे शेवटचे दिनांकास सर्व कागदपत्रे व प्रमाणपत्रे वैध असणे आवश्यक राहील. एकदा अर्ज सादर केल्यानंतर त्यानंतरचे कुठलेही कागदपत्रे व प्रमाणपत्रे ग्राहय धरण्यांत येणार नाही तसेच कोणत्याही कागदपत्रांचा/प्रमाणपत्राचा स्विकार केला जाणार नाही किंवा उमेदवारास त्यामध्ये बदल अथवा दुरूस्ती करता येणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

**आवेदन शुल्क (ऑनलाईन (Online) पध्दतीने)**

१. मागावसर्गीय उमेदवारांकरिता रू २५०/-

२. बिगरमागासवर्गीय उमेदवारांकरिता रू ५००/-

**टिप - अपंग व माजी सैनिक उमेदवारांनी आवेदन शुल्क भरण्याची आवश्यकता नाही.**

**सर्व साधारण शर्ती/अटी व सुचना :**

| | |
|---|---|
| १) | उमेदवार हा महाराष्ट्रातील रहीवासी व भारतीय नागरीक असावा (पुरावा म्हणून अधिवास व राष्ट्रीयत्व प्रमाणपत्राची प्रत (Domicile & Nationality Certificate) कागदपत्र पडताळणी दरम्यान सादर करणे आवश्यक राहील) |
| २) | उमेदवारास मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान असणे आवश्यक आहे. |
| ३) | उमेदवारांना लेखी परिक्षा व कागदपत्रे पडताळणी करीता नियोजित ठिकाणी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल. |
| ४) | रिक्त पदांच्या संख्येत व आरक्षणात कमी/जास्त बदल होण्याची शक्यता आहे. तत्कालीन परिस्थितीनुसार परिक्षेचा प्रकार, पदांची संख्या, आरक्षण याबाबत बदल करणे, परिक्षा कोणत्याही टप्प्यावर स्थगित करणे वा रद्द करणे किंवा अशंता बदल करणे याबाबतचे संपूर्ण अधिकार विद्यापीठाने स्वतःकडे राखून ठेवलेले आहे. याबाबत कोणालाही कोणत्याही प्रकारचा दावा सांगता येणार नाही. |

| | |
|---|---|
| ५) | महिलांसाठी असलेले आरक्षण हे संबंधित सामाजीक प्रवर्गासाठी समांतर राहील, तथापी संबंधित प्रर्वगातील महिला उमेदवार उपलब्ध न झाल्यास आरक्षित असलेली पदे इतरत्र अदलाबदल न करता त्या-त्या प्रवर्गातील गुणवत्तेनुसार पात्र ठरणा-या पुरूष उमेदवारामधून भरण्यांत येतील. |
| ६) | खुल्या प्रवर्गातील महिला या समांतर आरक्षणाचा लाभ घेण्यास इच्छूक उमेदवारांकडे (अनुसूचित जाती/जमातीसह) महिला खुला प्रवर्गासाठी आवश्यक व अर्ज सादर करण्याचे शेवटचे दिनांकास वैध असलेले व त्यादिनांकापुर्वी प्राप्त झालेले नॉन क्रिमिलेयर प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. |
| ७) | शासन परिपत्रक क्र. पीआई/२००४/३८५५/प्रशि-१, दिनांक २ जून २००५ नुसार माजी सैनिक या समांतर आरक्षणामध्ये माजी सैनिक अथवा युध्द काळात व युध्द नसतांना सैनिक सेवेत मृत्यु पावलेल्या किंवा अपंगत्व येवून त्यामुळे नोकरीसाठी अयोग्य झालेल्या माजी सैनिकाच्या कुटूंबातील फक्त जवानाची पत्नी किंवा अपंग जवानाची पत्नी यांना पात्र समजण्यांत येईल. |
| ८) | समांतर आरक्षणा अंतर्गत पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर पदे त्या-त्या प्रवर्गातुन इतर पात्र उमेदवारातुन गुणवत्तेनुसार भरण्यात येतील. |
| ९) | वि.जा.-अ व इमाव प्रवर्गातील सर्व उमेदवारांना सामाजीक आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी संबंधीत उमेदवारांकडे अर्ज सादर करण्याचे शेवटचे दिनांकास वैध असलेले व त्यापुर्वी प्राप्त झालेले नॉन क्रिमिलेयर प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. |
| १०) | निवड प्रक्रीये दरम्यान लेखी परिक्षेतील गुणवत्तेनुसार प्रवर्गनिहाय व समांतर आरक्षणनिहाय उमेदवारांना पर्याप्त संख्येत कागदपत्रांची पडताळणीकरीता बोलाविण्यात येईल त्यावेळेस अर्ज सादर करण्याचे शेवटचे दिनांकास वैध व त्या दिनांकापुर्वी प्राप्त असलेले व ऑनलाईन पध्दतीने भरलेल्या अर्जामध्ये उमेदवाराने भरलेल्या माहितीनुसारच कागदपत्रे व प्रमाणपत्रे ग्राहय धरण्यांत येतील याव्यतिरिक्त कुठलेच कागदपत्रे ग्राहय धरण्यात येणार नाहीत याची नोंद घ्यावी. |
| ११) | निवड प्रक्रीये दरम्यान अथवा नियुक्तीनंतर कोणत्याहीक्षणी उमेदवारांनी अर्जात व अर्जासोबत दिलेली माहिती / कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास अथवा अर्जदार अपात्र आढळून आल्यास अशा उमेदवारांची उमेदवारी/नियुक्ती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर तात्काळ रद्द करण्यात येईल. |
| १२) | मागास प्रवर्गातील उमेदवारास त्यांचे प्रवर्गाव्यतिरिक्त खुल्या प्रवर्गा साठीसुध्दा अर्ज करावयाचा झाल्यास त्यांचे व्दारे खुला प्रवर्गाकरीता आवश्यक असलेल्या सर्व शर्ती व अटींची पुर्तता करुन रु. ५००/- शुल्काचा भरणा करणे आवश्यक राहील. |
| १३) | शासन, सामान्य प्रशासन विभाग, निर्णय क्र बीसीसी२०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६-ब, दिनांक १२ डिसेंबर, २०११ नुसार मागासवर्गीय प्रवर्गातुन उमेदवाराची निवड झाल्यास अशा उमेदवारास तात्पुरत्या नियुक्तीपासुन ६ महिन्याचे आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधणकारक राहील जे उमेदवार विहीत कालावधीत जातवैधता प्रमाणपत्र सादर करण्यास असमर्थ होतील अशा उमेदवारांच्या सेवा तात्काळ समाप्त करण्यात येतील |
| १४) | शासकीय-निमशासकीय सेवेत नियमीत आस्थापनेवर कार्यरत कर्मचा-यांनी त्यांचे अर्ज त्यांच्या सक्षम प्राधिका-याच्या पूर्वपरवानगीने सादर करावे व अशा परवानगीचे पत्र (ना हरकत प्रमाणपत्र) उमेदवारांकडे असणे आवश्यक आहे व ऑनलाईन अर्जामध्ये याची नोंद घेणे आवश्यक राहील. |
| १५) | महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटूंबाचे प्रमाणपत्र) नियम २००५ मधील नियम ४ मधील तरतुदीनुसार लहान कुटूंब मर्यादेचे नमूना अ मधील प्रमाणपत्र ऑनलाईन अर्जासह सादर करणे आवश्यक आहे. |
| १६) | शासन निर्णय क्र. अंनियो-१००५/१२६/सेवा-४, दिनांक ३१ ऑक्टोंबर, २००५ प्रमाणे निवड झालेल्या उमेदवारांना परिभाषित अंशदान निवृत्ती योजना लागू राहील. |
| १७) | या विद्यापीठात व इतर आस्थापनांवरील कार्यरत कर्मचा-याची निवड झाल्यास कृषि विज्ञान केंद्राच्या सेवेत रूजु होण्याकरीता त्यांना त्यांच्या पुर्वीच्या पदाचा राजीनामा देणे आवश्यक राहील. अन्यथा संबंधीत उमेदवारास कृषि विज्ञान केंद्राच्या सेवेत रूजु करून घेतले जाणार नाही. |
| १८) | **अर्जदाराने त्याच्या निवडीसाठी प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष दबाव आणल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यांत येईल.** |

**स्वाक्षरीत/-**

कुलसचिव,

डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला